

# जनावरांतील 'थायलेरियोसीस' आजार

परोपजीवीमुळे जनावरांमध्ये विविध आजार होतात. 'थायलेरियोसिस' हा सुद्धा परोपजीवीमुळे होणारा एक आजार आहे. या आजाराचा प्रसार गोचिडाद्वारे होतो. याचा प्रादुर्भाव 'थायलेरिया ॲन्युलाटा' या रक्तातील परोपजीवीमुळे होतो. या आजाराची लागण प्रामुख्याने संकरित गाई, बैल तसेच वासरांमध्ये मोठ्या प्रमाणात उन्हाळा आणि पावसाळ्याच्या सुरूवातीला दिसून येतो. आजाराचा प्रसार जनावरांच्या शरीरावरील गोचिडामुळे होत असल्याने त्याला 'गोचीड ज्वर' असे म्हटले जाते. आजारी जनावरांना वेळीच उपचार न मिळाल्यास त्याचा मृत्यू होऊन पशुपालकाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होऊ शकते, त्यामुळे पशुपालकांनी आजाराकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

**रोगाचा प्रसार :**

संकरित जनावरे तथा लहान वासरांमध्ये रोगाचा प्रसार शरीरावरील गोचिडाद्वारे होतो. 'हायलोमा' नावाचे गोचीड रक्त शोषण करत असताना त्यांच्या लाळेद्वारे 'थायलेरिया ॲन्युलाटा' हे रक्त परोपजीवी जनावरांच्या शरीरात प्रवेश करतात. पुढे रोगाचा प्रादुर्भाव होतो. जनावरांच्या शरीरात प्रवेश झाल्यानंतर हे रक्त परोपजीवी लाल आणि पांढऱ्या पेशीवर हल्ला करून शरीरावर अपायकारक परिणाम करतात आणि परिणामी हा रोग दिसून येतो. लहान वासरांमध्ये रोगाचा प्रादुर्भाव वयाच्या १५ दिवस ते एक महिन्यापर्यंत आढळून आल्याची संशोधनाद्वारे नोंद आहे.

**रोगाची लक्षणे :**

- आजारी जनावरांना सडकून १०५ ते १०६ अंश से. ताप येतो, ताप बरेच दिवस राहतो.
- जनावर सुस्त होतात, चारा खाणे, पाणी पिणे आणि रवंथ करणे मंदावते.
- जनावरांच्या शरीरातील महत्त्वाच्या लिम्फ ग्रंथीवर मोठ्या प्रमाणात (जवळपास नारळाएवढी) सूज येते.
- आजारी जनावरांच्या नाकाद्वारे आणि डोळ्यांतून चिकट स्त्राव वाहू लागतो.
- दुधाळ जनावरांमध्ये दुग्धोत्पादनात कमालीची घट होते.
- आजारी जनावरांमध्ये वेळीच उपचार न मिळाल्यास पुढे रक्तक्षय आणि कावीळ होऊ शकतो आणि प्रकृती आणखी गंभीर होऊ शकते.
- शरीरातील हिमाग्लोबिनचे प्रमाण कमी होत गेल्याने जनावरांना अशक्तपणा, थकवा येतो व नंतर श्वासोच्छ्वासास त्रास होऊन मृत्यू दिसून येतो. आजाराचे स्वरूप घातक असल्याने मृत्यूचे प्रमाणही जनावरांमध्ये जास्त आहे. आजाराची लक्षणे आढळल्यास तत्काळ जवळील पशुवैद्यकीय प्रयोगशाळेतून रक्ताची आणि लिम्फ ग्रंथीच्या स्त्रावाची तपासणी करून रोगाचे निदान करावे.
- संकरित जनावरांमध्ये थायलेरीयोसीसची लक्षणे मोठ्या प्रमाणावर आढळून येतात.

**रोगाचा प्रतिबंध :**

'थायलेरीयोसीस' या आजाराचा प्रादुर्भाव आपल्या जनावरांना होऊ द्यावयाचा नसेल तर गोचीड नियंत्रण करणे गरजेचे आहे. जनावरांच्या शरीरावरील तसेच कुरणातील, गोठ्यातील गोचिडांचे योग्य ते नियंत्रण आणि व्यवस्थापन केल्यास हा आजार दुधाळ जनावरांच्यापासून दूर राहून पशुपालकांना दुग्ध व्यवसायात आर्थिक फायदा होऊ शकतो.


**प्रकाशन**

**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, संशोधन अनुदान अंतर्गत**



**✲ मार्गदर्शक ✲**

www.mafsu.in

www.knpcvs.in

**कर्नल प्रा. (डॉ.) ए. एम. पातुरकर**
मा. कुलगुरु, मपमविवि, नागपुर

**डॉ. एस. व्ही. उपाध्ये**
अधिष्ठाता, पशुविज्ञान विद्याशाखा, मपमविवि, नागपुर

**डॉ. एन. व्ही. कुरकुरे**
संचालक संशोधन, मपमविवि, नागपुर

**डॉ. ए. यु. भिकाने**
संचालक विस्तार शिक्षण, मपमविवि, नागपुर

**डॉ. व्ही. डी. आहेर**
सहयोगी अधिष्ठाता
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

**✲ संकलन ✲**

**डॉ. स्मिता आर. कोल्हे**
संशोधन प्रकल्प प्रमुख, पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

**संपर्क : टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३२६८ सकाळी १० ते सायं. ६ वा.**